# संपादकीय

## जलदगती न्यायाइतकेच हेही महत्वाचे

बलात्कार पीडितांना जलदगतीने न मिळणारा न्याय हा सामाजिक चिंतेचा विषय आहे. मुळात त्या दुर्दैवी घटनेने पीडिता आणि तिच्या कुटुंबियांचे मनोधैर्य खच्ची झालेली असते. त्यात न्यायाला होणारा विलंब त्यांच्यासाठी निराशा वाढवणाराच ठरतो. बलात्कार पीडितांचा समावेश असलेल्या प्रकरणांमध्ये कोणताही अनावश्यक विलंब केवळ त्यांचा त्रास वाढवतो आणि वेळेवर न्याय मिळण्यात अडथळा निर्माण करतो अशी टिप्पणी दिल्ली उच्च न्यायालयाने देखील एका प्रकरणात केली होती. त्याच आशयाच्या भावना एका पीडितेने न्यायसंस्थेसमोर व्यक्त केल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. ती वाराणसी आयआयटीची विद्यार्थिनी आहे. तिच्यावर सामूहिक बलात्कार झाला आहे. हे प्रकरण देशभर गाजले. त्याची सुनावणी वाराणसी जलदगती न्यायालयात सुरू आहे. न्यायाची प्रतीक्षा वाढतच चालली आहे. यामुळे माझी निराशा वाढत आहे अशा भावना तिने व्यक्त केल्याचे वृत्तात म्हंटले आहे. अजमेरमधील एका पीडितेला तर न्यायाची तब्बल ३२ वर्षे वाट पाहावी लागली होती. तिच्या वेदना माध्यमात प्रसिद्ध झाल्या होत्या. वास्तविक पीडिता आणि तिचे कुटुंबीय प्रचंड मानसिक ताणात असतात. त्यांचे मानसिक खच्चीकरण झालेले असते. न्याय जलदगतीने मिळावा अशी त्यांची अपेक्षा रास्तच. तसे घडणे तिच्यावरील अन्यायाचे थोडेतरी परिमार्जन करणारे ठरू शकेल. अशा घटनांमध्ये दोषींना कडक शिक्षा व्हावी म्हणजे तसा गुन्हा करण्याची हिंमत कोणाचीही होणार नाही अशाच भावना सामान्य माणसेही व्यक्त करतात. तथापि तसे अभावानेच घडते हे वाराणसी प्रकरणाने अधोरेखित केले आहे. विलंबाने मिळणाऱ्या न्यायाला न्याय म्हंटले जाऊ शकेल का? त्याबरोबरीने समाजात अशा घटना वेगाने का वाढत आहेत याचाही विचार करणे गरजेचे आहे. मानसिक विकृती वाढत आहे. अजाण वयाच्या बालिकेपासून वयोवृद्ध महिला त्याच्या बळी ठरतात. ही मानसिकता कशी बदलते? का बदलते? मूल्यांची घसरण हे त्याचे एक प्रमुख कारण मानले जाते. सामाजिक आणि कौटुंबिक मूल्यांची वीण विसविशीत होते आहे. ती घट्ट करणारा परस्पर संवाद हरपला आहे. तो कसा सुस्थापित करता येईल, मूल्यसंस्कार कसे केले जाऊ शकतील यावर विचारमंथन होणे अत्यंत गरजेचे आहे. किती युवांना त्यांच्या भावनांचे नियमन करता येते? किंवा ते कसे करायचे याचे ज्ञान असते? बहुसंख्यांना ते जमत नाही कारण तसे ते शिकवलेच जात नाही. सरधोपटपणेच त्याकडे पाहिले जाते. किंवा तसे मुलांना शिकवायचे असते हेच बहुसंख्य पालकांना माहित नसते. परिणामी भावभावना वेडेवाकडे वळण घेण्याचा धोका बळावू शकतो. समाजमाध्यमांची काळी बाजू त्यात भरच घालणारी ठरते. सामाजिक विकासात आणि कौटुंबिक बांधिलकीसाठी युवांचा सर्वांगिण व्यक्तिमत्व विकास मैलाचा दगड ठरतो. तो त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतो. तो कसा साध्य होऊ शकेल यावरही काम होणे काळाची गरज आहे. जलदगती न्यायाइतकेच तेही महत्वाचे आहे.

# प्राजक्त तनपुरेंना तुम्ही आमदार करा, कॅबिनेट मंत्रीपदाची जबाबदारी माझी

### ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा राहुरीच्या जनतेला शब्द : तरूणांना नोकरी मिळेपर्यंत ४ हजार देण्याचा संकल्प

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)**– तुम्ही मला प्राजक्त तनपुरे सारखा आमदार द्या, तुम्हाला कॅबिनेट मंत्री मी देणार, ही जबाबदारी माझी, असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरदचद्र पवार यांनी राहुरी मतदारसंघातील जनतेला दिले.

राहुरी, पाथर्डी, नगर विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार माजी मंत्री आ. प्राजक्त तनपुरे या निवडणुकीच्या विजय संकल्प सभेच्या व्यासपिठावरून प्रमुख मार्गदर्शन करताना वांबोरी येथील बाजार समिती मैदानावर आयोजित विराट सभेत त्यांनी आश्वासीत केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कार्यकर्ते एकनाथराव ढवळे होते. तर व्यासपिठावर राष्ट्रवादी काँग्रेस युवतीच्या प्रदेशाध्यक्षा सक्षणाताई सलगर, माजी आ. दादाभाऊ कळमकर, माजी खा. प्रसादराव तनपुरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, सभापती अरूण तनपुरे, हर्ष तनपुरे, अशोक बाबर, बाळासाहेब हराळ, दत्तात्रय आडसुरे, गोविंद मोकाटे, सोमनाथ धूत, अमोल जाधव, बाबासाहेब भिटे, अ‍ॅड. अभिषेक भगत, रघुनाथ झिने, अ‍ॅड. ऋषिकेश मोरे, डॉ. उषाताई तनपुरे, अभिजित ससाणे, विजयराव डौले, रावसाहेब चाचा तनपुरे, सुरेश लांबे, सुरेशराव वाबळे, नितिन बाफना, सुरेश बाफना आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीच्या मित्र पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

खा. शरदचंद्र पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीत राहुरीकरांनी निलेश लंकेंच्या पारड्यात भरभरून मते देऊन आपल्या आवाहनाला प्रतिसाद दिला. त्याबद्दल सर्वांचे त्यांनी आभार मानताना लोकसभेत राज्य करताना २७२ संख्याबळ पुरेसे असताना ४०० पार देण्याचे आवाहन का होते? ते केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी



दिलेल्या घटनेत बदल करण्यासाठी होते. हे देशातील जनतेने ओळखले व भाजपाचे हे मनसुबे मागसवर्गीय मतदारांनी उधळून लावले. महाविकास आघाडीच्या पारड्यात भरभरून मते टाकताना ३१ खासदार लोकसभेत पाठविले.

आज राज्यात बेरोजगारी वाढत असताना तरूणांना नोकरी मिळेपर्यंत ४ हजार रुपये देण्याचे महाविकास आघाडीच्या शासनाचा संकल्प आहे. त्याच बरोबर शेती, शेतकरी व वंचित वर्गासाठी भरीव काम करावे, लागेल, असाही मानस त्यांनी बोलून दाखविला.

आ. प्राजक्त तनपुरे यांनी पहिल्याच टर्ममध्ये मंत्रिपदी काम करताना विश्वास दाखविल्याबद्दल मतदार संघातील जनतेच्या वतीने खा. पवारांचे आभार मानताना उर्जा खात्याच्या माध्यमातून राज्याची कोलमडलेली वीज यंत्रणा सावरण्याबरोबर मतदार संघात ६०० च्या आसपास ट्रान्सफॉर्मर, चार सौरउर्जा प्रकल्प, ८ सबस्टेशनची नवनिर्मिती, अनेक लिंक लाईन व सबस्टेशनची क्षमता वाढ ही कामे मार्गी लावली. निळवंडेच्या ज्या प्रश्नावर १० वर्षे झुलवत ठेवून १२५० कोटींचा निधी मिळवून प्रत्यक्षात निळवंडेचे पाणी तालुक्यात आणण्याचे वेगळेच समाधान लाभल्याचे त्यांनी सांगीतले. समोरच्या उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभुमी एवढी आहे की, काही वेळा कायद्यातील कलमे कमी पडतात की काय? असे वाटणे साहजिक होते. परंतु ही पार्श्वभुमी छापताना हे लपविण्यासाठी इंग्रजी वृत्तपत्रातून नोटिफीकेशन छापणारे नेमके जनतेपासून काय लपवीत आहेत, असा सवाल त्यांनी केला. वांबोरी चारीच्या शेवटच्या पाथर्डीच्या टोकापर्यंत पाणी ५ वर्ष ओव्हर फ्लोने पोहचले. आपल्या कारकिर्दीतील एकच भरीव काम समोरील उमेदवाराने सांगावे, असे आवाहन आ. तनपुरेंनी केले. लाडकी बहिण योजनेचा डांगोरा पिटत मते मागणारे आपल्या सख्ख्या पुतणीचा, भावांच्या जमिनी घरेदारे, लुबाडण्यासाठी त्रास देताना ते तुम्हाला काय देणार? असा सवाल राष्ट्रवादीच्या युवतीच्या प्रदेशाध्यक्षा सक्षणाताई सलगर यांनी केला. सभेचे सूत्रसंचालन अ‍ॅड. ऋषिकेश मोरे यांनी केले. यावेळी अ‍ॅड. अभिषेक भगत, गोविंद मोकाटे आदींनी आपल्या भाषणातून कर्डिलेंचा चांगलाच समाचार घेतला.

### पक्ष फोडणे सोपे, फडणवीस यांना टोला

- राज्यातील जनतेने इतर पक्ष फोडाफोडी करून आलेले शासन त्याच निवडणुकीत पूर्णपणे नाकारले, परंतु, जे फडणवीसांनी मी दोन पक्ष फोडले, अशी जाहीर वल्गना केली. मात्र, स्वाभिमानी महाराष्ट्राला हे पटलेले नाही. पक्ष फोडणे सोपे असते. पक्ष उभा करणे अवघड असते, याची जाणीव फडणवीसांना मतदारांनी मतपेटीतून करून दिली.

# मारहाण झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

### एलसीबीच्या पोलिसांना खबर दिल्याच्या आरोपावरून झाली होती मारहाण

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– एलसीबीच्या पोलिसांना तलवार विक्री करत असल्याची माहिती दिल्याच्या आरोपावरून युवकाला चाकू, लाकडी दांडके, दगड, पट्ट्याने मारहाण केल्याची घटना २ नोव्हेंबर रोजी घडली होती. यात जखमी असलेल्या करण अर्जुन साळुंके (वय २२ रा. जे.जे. गल्ली, कोठला) या युवकाचा जिल्हा रूग्णालयात उपचारादरम्यान बुधवारी मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पाच जणांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्यात खुनाचे कलम वाढविण्यात आले आहे.

सचिन सर्जेराव चव्हाण, संतोष भैरवनाथ पवार (दोघे रा. मंगलगेट, अहिल्यानगर), सचिन लल्लू पवार (रा. कडा ता. आष्टी जि. बीड), प्रवीण सुभाष पवार (रा. भिस्तबाग चौक, सावेडी) व रंजित एकनाथ साळुंके (रा. गजराजनगर, अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर रस्ता) यांच्यावर ४ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल झाला होता. २ नोव्हेंबर रोजी रात्री करण हा कोठला परिसरातील कोंड्या मामा चौक येथे असताना त्याचा नातेवाईक सचिन सर्जेराव चव्हाण, संतोष भैरवनाथ पवार व सचिन लल्लु पवार हे दुचाकीवरून तेथे आले. अनिल सर्जेराव चव्हाण यांच्याकडे पैसे आणण्यासाठी गजराजनगर येथे जायचे आहे, असे म्हणत त्यांनी करण याला दुचाकीवर बसवून गजराजनगर परिसरातील बांबुच्या दुकाना जवळ नेले. तेथे गेल्यानंतर प्रवीण पवार, रंजित साळुंके हे तेथे आले. त्यांनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. 'तू एलसीबीच्या पोलिसांना मी तलवार विक्री करतो म्हणून माझी माहिती का दिली' असे म्हणत हत्याराने वार केला. लाकडी दांडके, दगड, कंबर पट्ट्याने मारहाण करून जखमी केले. त्याच्यावर उपचार सुरू असतानाच बुधवारी त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी गुन्ह्यात खुनाचे कलम वाढवले आहे. पोलीस पसार संशयित आरोपींचा शोध घेत आहेत.

# विधानसभेच्या मतदानासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– विधानसभा निवडणूकसाठी जिल्ह्यात सर्व विधानसभा मतदारसंघात बुधवारी (२० नोव्हेंबर) मतदान होणार आहे. त्या दिवशी मतदारांना मतदान करता यावे यासाठी राज्य शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

विधानसभा निवडणुकीत कामगारांना मतदान करता यावे यासाठी निवडणूक क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. ही सुट्टी राज्य शासन, केंद्र शासन व खासगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स आदी आस्थापनांना लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी-कर्मचारी इत्यादीना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसल्यास मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत कामगारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी किंवा व्यवस्थापनाने वरील आदेशाचे अनुपालन होईल याची खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल. याबाबत तक्रार असल्यास सहायक कामगार आयुक्त कार्यालय, मुलजी निवास, डॉ. चोंभे हॉस्पिटल, बालिकाश्रम रस्ता, सावेडी, अहिल्यानगर येथे करावी, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त रे. मु. भिसले यांनी केले आहे.

# अंध मतदारांसाठी ब्रेल लिपित मतपत्रिका

### विधानसभा निवडणूक : जिल्ह्यात ३ हजार ७८७ अंध मतदार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यात ३ हजार ७८७ अंध मतदार आहेत. निवडणूक आयोगाने त्यांच्यासाठी खास ब्रेल लिपित मतपत्रिका तयार केली. त्याच बरोबर मतदार माहिती चिठ्ठी ही ब्रेल लिपित दिली जाणार आहे. नाशिक येथील दि. ब्लाईंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन या संस्थेला राज्य निवडणूक आयोगाने ही जबाबदारी सोपविली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने दिव्यांग मतदारांसाठी विविध सुविधा मतदान केंद्रामध्ये उपलब्ध करून दिल्या आहेत. दिव्यांग मतदारांना इतर मतदारांप्रमाणे रांगेत उभे रहावे लागत नाही. त्यांना तत्काळ मतदान केंद्रात प्रवेश देऊन मतदानाची प्रक्रिया पार पाडली जाते. निवडणूक आयोगाने दिव्यांग अंध मतदारांसाठी विशेष काळजी घेतली आहे. अंध मतदार मतदानासाठी आल्यानंतर त्यांना ब्रेल लिपितील मतपत्रिका मतदान केंद्र प्रमुख देणार आहे. या मतदान प्रक्रियेमध्ये उमेदवाराचा अनुक्रमांक, नाव, पक्ष आणि चिन्ह या बाबींचा समावेश राहणार आहे. अंध मतदाराला ब्रेल लिपितील ही मतपत्रिका बोटांच्या सह्याने समजून घेता येणार आहे. त्यानंतर मतदाराला ई.व्ही.एम. मशिनवर जाऊन मतदान करता येणार आहे.

**मतदारसंघनिहाय अंध मतदार**

अकोले ३०२, संगमनेर २५०, शिर्डी २४०, कोपरगाव २९९, श्रीरामपूर ४२०, नेवासा २६१, शेवगाव ५३६, राहुरी २३७, पारनेर ४९५, अहमदनगर शहर १११, श्रीगोंदे २६२, कर्जत-जामखेड ३७४.

# कार्तिकी पौर्णिमेनिमित्त पुणतांबा येथे यात्रेची जय्यत तयारी

**पुणतांबा (वार्ताहर)**– महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पुणतांबा येथील गोदावरी नदीच्या तीरावर असलेल्या अहिल्यादेवी घाटावर पुरातन महाराष्ट्रातील मोजक्या मंदिरांपैकी एक कार्तिक स्वामींचे मंदिर पुणतांबा येथे आहे. १५ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी कृतिका पौर्णिमेला दरवर्षी येथे मोठी यात्रा भरत असून त्यानिमित्त भरणाऱ्या यात्रेची जय्यत तयारी सुरु करण्यात आली आहे.

अंदाजे एक लाखापेक्षा जास्त भाविक कृतिका नक्षत्राच्या मूहूर्तावर कार्तिक स्वामी मूर्तीचे दर्शन घेतील, असा प्राथमिक अंदाज आहे. गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असल्याने भाविकांना गंगा स्नानाची पर्वणीच या दिवशी मिळणार आहे.




शुक्रवारी सकाळी ६:२० पासून कार्तिक पौर्णिमा सुरू होत असल्याने व कृतिका नक्षत्र पर्वकाळ हा रात्री ९:५५ ते शनिवारी पहाटे २:५९ मिनिटापर्यंत आहे. या नक्षत्र पर्व काळामध्ये वर्षातून एकदाच महिलांना कार्तिक स्वामींच्या दर्शनाचा योग असतो. भगवान शंकर आणि पार्वतीचा मोठा पुत्र तर गणपतीचा मोठा भाऊ कार्तिकेय हा देवांचा योद्धा सेनापती असल्यामुळे त्यांचे वाहन मोर होते. त्यामुळे कार्तिक पौर्णिमेला मोरपिसांची विक्री मोठ्या प्रमाणात केली जाते. १५ नोव्हेंबर सकाळ पासूनच दर्शनाकरिता सर्वांसाठी मंदिर खुले राहणार आहे. कार्तिक स्वामी मंदिरासमोर महिलांना त्रिपुरा वाती जाळण्याकरिता जागोजागी होमकुंड तयार करण्यात येणार आहे. मुहूर्त काळामध्ये कार्तिक स्वामींचा अभिषेक करून आरती केल्यानंतर दर्शनास सुरुवात होणार आहे. पर्व काळामध्ये कार्तिक स्वामी भक्त मंडळांकडून अखंड कार्तिक स्वामींचा जप करण्यात येणार आहे. भाविक भक्तांच्या दर्शनासाठी रांगेची व्यवस्था करण्यात येणार आहे तसेच पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात राहणार आहे. तरी सर्व भाविकांनी विशेषता: महिलांनी कार्तिक स्वामी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्तिक स्वामी भक्त मंडळ पुणतांबा यांनी केले आहे.

# कार्तिक पौर्णिमेदरम्यान तीन दिवस ढगाळ वातावरण

### रविवारपासून पुन्हा थंडी वाढणार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– विदर्भ वगळता संपूर्ण महाराष्ट्रात १४ ते १७ नोव्हेंबर (गुरूवार ते शनिवारी) तीन दिवस ढगाळ वातावरण राहून अगदीच तुरळक ठिकाणी झालाच तर नगण्य अशा किरकोळ स्वरूपाच्या पावसाची शक्यता जाणवते. या निरभ्र आकाशामुळे सध्या सकाळ-संध्याकाळी काहीशा वाढत्या थंडीला, या तीन दिवसासाठी विराम मिळेल, असा अंदाज हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला आहे.

सध्या जाणवणारा हा वातावरणीय परिणाम विशेष करून रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव लातूर या जिल्ह्यात अधिक जाणवणार आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक या जिल्ह्यात फार परिणाम जाणवणार नाही. रविवार १७ नोव्हेंबरपासून पुन्हा थंडीसाठी स्थिती पूर्ववत होईल. पुढील आठवडाभर महाराष्ट्रात दुपारचे कमाल व पहाटेचे किमान असे दोन्हीही तापमाने हे सरासरीइतके राहून कमाल तापमान हे ३१ तर किमान तापमान हे १५ ते १७ डिग्री सेंटीग्रेडच्या दरम्यान राहील. तसेच २० नोव्हेंबरपर्यंत चक्रीवादळसाठीची कोणत्याही वातावरणीय प्रक्रियेची शक्यता नसल्याचे खुळे यांनी 'सार्वमत'शी बोलताना स्पष्ट केले. दरम्यान, राज्यात सर्वाधिक कमी तापमान नाशिक जिल्ह्यात असून अहिल्यानगर जिल्ह्यात थंडीच्या वाढल्यामुळे गहू आणि हरभरा पिकांच्या पेरण्यांनी वेग धरला आहे.

पान १ वरुन

## कोचिंग सेंटर १०० टक्के निवड आणि नोकरीचा दावा करू शकत नाही

**कोचिंग सेंटर्ससाठीच्या मार्गदर्शक तत्वांच्या १० ठळक बाबी...**

कोचिंग सेंटर्स त्यांचे अभ्यासक्रम, त्यांचा कालावधी, फॅकल्टी, फी स्ट्रक्चर, सिलेक्शन रेट, परीक्षा रँकिंग आणि परतावा धोरण याबाबत खोटी आश्वासने देऊ शकत नाहीत.

कोणतेही कोचिंग सेंटर नोकरीच्या सुरक्षिततेची आणि पगारवाढीची हमी देऊ शकत नाही.

कोचिंग सेंटर्स लिखित संमतीशिवाय टॉपर्सची नावे, फोटो आणि प्रशस्तिपत्रे वापरू शकणार नाहीत.

जर कोणत्याही कोचिंग सेंटरला एखाद्या टॉपरचे नाव त्याच्या जाहिरातीसाठी वापरायचे असेल, तर त्याला निवडीनंतर उमेदवाराची लेखी परवानगी घ्यावी लागेल.

कोचिंग सेंटर्सना त्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित सर्व आवश्यक माहिती विद्यार्थ्यांना सांगावी लागेल.

कोचिंग सेंटर्सना सांगावे लागेल की तेथे टॉपर्स कोणत्या कोर्समध्ये दाखल झाले. म्हणजेच त्याने कोणत्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता.

कोचिंग सेंटर्सना टॉपर्सबाबत स्पष्ट डिस्क्लेमर प्रिंट करावे लागतील. त्यांना हे सांगावे लागेल की ते कोचिंग प्रमोशनसाठी टॉपर कोणत्या कोर्सशी संबंधित होते आणि किती काळासाठी.

ही मार्गदर्शक तत्त्वे समुपदेशन, क्रीडा आणि सर्जनशील क्टिव्हिटीसाठी नाहीत.

कोचिंग सेंटर्सना त्यांच्या सेवा, सुविधा, संसाधने आणि पायाभूत सुविधांची माहिती द्यावी लागेल.

कोचिंग सेंटर्सना कळवावे लागेल की त्यांचा कोर्स एआयसीटीई, यूजीसी सारख्या कोणत्याही प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त आहे की नाही.

अधिकारी म्हणाले- सरकार कोचिंग सेंटरच्या विरोधात नाही

ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे म्हणाल्या, आम्ही कोचिंग सेंटर्स विद्यार्थ्यांना प्रलोभन देण्यासाठी जाणीवपूर्वक सत्य लपवत असल्याचे पाहिले आहे. यामुळेच आम्हाला कोचिंग उद्योगासाठी ही मार्गदर्शक तत्त्वे आणावी लागली. सरकार कोचिंग सेंटर्सच्या विरोधात नाही, पण कोणत्याही जाहिरातीचा दर्जा हा ग्राहक हक्कांच्या विरोधात असू शकत नाही.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जानेवारीत मार्गदर्शक सूचनाही जारी केल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, वर्गांना आग लागण्याच्या घटना आणि कोचिंग सेंटरमध्ये सुविधांचा अभाव या घटनांनंतर या वर्षी जानेवारीमध्ये केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने मार्गदर्शक तत्त्वेही जारी केली होती. याअंतर्गत कोचिंग संस्था १६ वर्षांखालील मुलांना प्रवेश देऊ शकणार नाहीत. याशिवाय दिशाभूल करणारी आश्वासने देणे, चांगल्या गुणांची हमी देण्यावरही बंदी घालण्यात आली.

**कोचिंग सेंटर्ससाठी नवीन मार्गदर्शक तत्वे–**

विद्यार्थी हे ग्रॅज्युएटपेक्षा कमी पात्र नसावेत.

त्यात चांगले मार्क्स आणि रँकची कोणतीही हमी देवू शकत नाहीत.

१६ वर्षपेक्षा कमी वयाच्या विद्यार्थ्यांची नावनोंदणी करू शकत नाही.

माध्यमिक शाळेच्या परीक्षेनंतरच नावनोंदणी केली जाईल.

प्रत्येक कोर्सची शिकवणी फी निश्चित केली जाईल, फी मध्ये वाढ केली जाणार नाही, पावती द्यावी लागेल.

नियोजित वेळेपूर्वी तुम्ही कोर्स सोडल्यास, तुम्हाला उर्वरित शुल्क १० दिवसांच्या आत परत करावे लागेल.

जर विद्यार्थी वसतिगृहात राहत असेल तर त्याला वसतिगृहाची फी आणि मेसची फी देखील परत करावी लागेल.

नैतिक गुन्ह्यांसाठी दोषी असलेल्यांनी प्राध्यापकांमध्ये नसावे.

समुपदेशन प्रणालीशिवाय कोचिंग नोंदणी होणार नाही.

वेबसाइटवर प्राध्यापकांची पात्रता आणि अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा कालावधी नमूद करावा लागेल.

वसतिगृहाच्या सुविधा आणि शुल्काची संपूर्ण माहिती द्यावी लागेल.

मुलांच्या मानसिक तणावाकडे लक्ष द्यावे लागेल, चांगल्या कामगिरीचे दडपण येणार नाही.

विद्यार्थी अडचणीत किंवा तणावाखाली असतील तर त्यांच्या मदतीसाठी यंत्रणा निर्माण करावी लागेल.

कोचिंग सेंटरमध्ये मानसशास्त्रीय समुपदेशनासाठी एक माध्यम असावे.

मानसशास्त्रज्ञ आणि समुपदेशकाचे नाव आणि कामाच्या वेळेची माहिती पालकांना द्यावी लागेल.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षक मानसिक आरोग्य विषयांचे प्रशिक्षण देखील घेऊ शकतात.

मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करणाऱ्या कोचिंग सेंटर्सना एक लाख रुपयांपर्यंत दंड आकारला जाईल.

जास्त शुल्क आकारल्यास नोंदणी रद्द केली जाईल.

## नरेंद्र मोदींची आज मुंबईत सभा

जेमतेम पाच दिवस उरले आहेत. त्यामुळे भाजपने आपल्या शीर्षस्थ नेत्यांच्या निवडणूक सभांचा सपाटा लावला आहे. त्यानुसार पंतप्रधान मोदी गुरुवारी दिवसभरत तीन सभा घेणार आहेत.

पंतप्रधान मोदी यांची पहिली सभा आज दुपारी एक वाजता छत्रपती संभाजीनगर येथे होईल. त्यानंतर नवी मुंबईतील सेंट्रल पार्क खारघर येथे दुपारी चार वाजता मोदींची दुसरी सभा पार पडेल. नवी मुंबईची सभा आटोपून मोदी संध्याकाळी सहा वाजता दादर, शिवाजी पार्क येथे आयोजित सभेला संबोधित करतील.

दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या आज मंगळवेढा, पंढरपूरमी नळदुर्ग, तुळजापूर आणि इचलकरंजी येथे तर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांची आज अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा आणि अचलपूर अशा दोन सभा होणार आहेत.